जा.क्र. राज्य योजना/ ८३५/२०१८
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
सिडको भवन, ४ था मजला, दक्षिण कक्ष,
बेलापूर, नवी मुंबई
दिनांक : ०७.०६.२०१८

प्रति,
उपायुक्त (विकास)
कोंकण विभाग, नवी मुंबई.

**विषय :** सिंधुदुर्ग जिल्हयातील पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजना सन २०१६-१७ अंतर्गत प्राप्त उद्दिष्ट व अनुदान सन २०१७-१८ करीता वापरण्यास मंजूरी मिळणेबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाकडील पत्र जा. क्र. ५६९/राज्य योजना/२०१८ दि. १५.०५.२०१८
२) आपलेकडील पत्र क्र. विकास/कार्या-६/यो-१/सिं.पं.दि.उघजा मंजूरी/२५५१ दि. ०५.०६.२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत सन २०१६-१७ अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयाकरीता प्राप्त उद्दिष्ट व अनुदान सन २०१७-१८ करीता वापरण्यास या कार्यालयाकडून मंजूरी देण्यात आलेली आहे.

कृपया माहितीस्तव.

सोबत : वरीलप्रमाणे

(मंजिरी टकले)
उपसंचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

# विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय (विकास शाखा)

दालन क्र.११०, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.
दुरध्वनी व फॅक्स क्र. ०२२-२७५६६६१२ ई मेल : dcdkonkan@gmail.com

पत्र क्र. विकास/कार्या-६/ यो-१/सिं.पं.दि.उघजा मंजूरी/ ५५७ दिनांक ०५/०६/२०१८

प्रति,

संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष,
ग्रामीण गृहनिर्माण- महाराष्ट्र राज्य,
सिडको भवन, दक्षिण कक्ष,
४ था मजला, सीबीडी बेलापूर.

**विषय :- सिंधुदुर्ग जिल्हयातील पंडीत दिन दयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजना सन २०१६-१७ अंतर्गत प्राप्त उद्दिष्ट व अनुदान सन २०१७-१८ करिता वापरण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

संदर्भ:- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे कडील अशा पत्र क्र. जिग्राविय/ रमाई/पंदीउयो/ १९४/ २०१८ दि. ११/०५/२०१८.

सुलभ संदर्भासाठी संदर्भिय अ.शा. पत्राची प्रत आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

संदर्भिय पत्रान्वये पंडीत दिन दयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अनुदान योजनेंतर्गत सन २०१६-१७ करीता ५४ लाभार्थ्यांसाठी रु. १३,५०,०००/- इतके अनुदान सिंधुदुर्ग जिल्हयास प्राप्त झालेले होते. परंतु विहित प्रवर्गातील पात्र लाभार्थी नसल्यामुळे त्यांचेकडून उद्दिष्ट पुर्तता करण्यात आलेली नाही. त्यामुळे शिल्लक उद्दिष्ट व निधी तसेच अतिरिक्त आवश्यक निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वापरणेस मान्यता मिळण्या करिता किंवा पंडीत दीन दयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अनुदान योजनेतुन सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता अनुसूचित जमाती प्रवर्गातुन ५३ चे उद्दिष्ट व निधी मिळणेस विनंती केलेली आहे.

सदर प्रकरणी आपले कार्यालयामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे प्रस्तावावर उचित कार्यवाही होणेस विनंती आहे.

सोबत:- संदर्भिय पत्र.

(गणेश चौधरी)
उप आयुक्त (विकास)
कोंकण विभाग, नवी मुंबई.

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी.